# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र-६५** **दिनांक - २८/०२/२०२४**

## शेअर मार्केटमध्ये ऑनलाईन गुंतवणुक करण्यास सांगुन केलेल्या फसवणुकीतील ११,८०,३०८/- रक्कम तक्रारदार यांना परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश !!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील वसई परीसरात राहणा-या श्रीमती. शाह यांना शेअर मार्केट मध्ये गुंतवणुक केल्यास अधिक नफा मिळविण्याचे आमिष आर्थिक फसवणुक झाली होती. सदर फसवणुकीच्या अनुषंगाने सायबर पोलीस ठाणे येथे तक्रारी अर्ज प्राप्त करण्यात आलेला होता. तसेच **माणिकपुर पोलीस ठाणे गु.रजी नं ०७/२०२४ भादविस कलम ४२०,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.**

**(सायबर गुन्हे कक्ष आवक अर्ज क्रमांक – ३७-बी/२०२३ दि. ०५/०१/२०२४)**

नमूद तक्रारीबाबत तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. प्राप्त माहितीचे अवलोकन केले असता तक्रारदार यांची रक्कम वेगवेगळया बँक खात्यात वळती झाल्याचे दिसुन आले. त्या अनुषंगाने तक्रारदार यांची रक्कम गोठविण्याबाबत संबंधीत बँकेसोबत पत्रव्यवहार करुन संशयीत खात्यामध्ये रक्कम गोठविण्यात आली. त्यानंतर मा.न्यायालयाकडुन तक्रारदार यांची रक्कम परत मिळविण्याकरीता सायबर पोलीस ठाणेचे अधिकारी/ अंमलदार यांनी वेळोवेळी पाठपुरावा केल्याने **तक्रारदार यांची फसवणुक झालेल्या रक्कमेपैकी ११,८०,३०८/- रक्कम त्यांचे खात्यावर परत मिळविण्यात आली आहे.**

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **Telegram Channel, facebook,Instagram** अथवा **Watsapp** वर जास्त परतावा देणा-या **Promotional Adds** वर विश्वास ठेवु नका. याद्वारे आपली आर्थिक फसवणुक होण्याची शक्यता आहे.
- **अश्या प्रकारच्या फसवणुकीमध्ये Telegram Channel, Watsapp Group वर ॲड करुन तेथे इतरांना कसा फायदा होत आहे याचे Sceenshot, Massages दाखवुन पैसे गुंतवणुक करण्यास प्रवृत केले जाते. गुंतवणुकदारांचा विश्वास संपादन करण्यासाठी सेबीची बनावट प्रमाणपत्रे दाखवुन फसवणुक करण्यात येते. एकदा गुंतवणुकदारांचा विश्वास जिंकला की, हे लोक गुंतवणुकदारांना जास्त व खात्रिशिर परताव्याची हमी देतात. अशा गुंतवणुकीमध्ये आर्थिक फसवणुक होण्याचा धोका मोठया प्रमाणात असतो.**
- **Share Market, Forex Trading, Crypto Investment, Mutual Funds** मधील गुंतवणुक करण्याअगोदर आपल्या वितीय सल्लागारासोबत चर्चा करुनच गुंतवणुक करा.
- **कोणतेही अनाधिकृत ॲप्लीकेशन डाऊनलोड करु नये अथवा अनोळखी लिंकवर क्लिक करुन नये.**
- **ऑनलाईन फसवणुक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउनि/ प्रसाद शेनोळकर, मपोअं/१३०८७ अमिना पठाण, मपोअं/१६१०६ सुवर्णा माळी, पोअं/२२००३ कुणाल सावळे, मपोहवा/१२००७ माधुरी धिंडे, मसुब/ आकाश बोरसे, मसुब/ राजेश भरकडे यांनी पार पाडली आहे.

**सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०**

**सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट :- www.cybercrime.gov.in**